.nagpur

# NMC e NEWS LETTER

डिसेंबर २०१९

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात...

### रस्ते आणि फुटपाथ मोकळे करण्याची कारवाई १ जानेवारीपासून

**मनपा आयुक्तांचे आदेश**

नागपूर महानगरपालिकेद्वारे १ जानेवारी २०२० पासून रस्ते आणि फुटपाथ मोकळे करण्याची कारवाईला प्रारंभ होत आहे. यासंबंधी मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी आदेश जारी केले आहेत.महापौर संदीप जोशी यांच्या 'वॉक अँड टॉक विथ मेयर' उपक्रमामध्ये प्रत्येक ठिकाणी रस्ते, फुटपाथवरील अतिक्रमणाच्या समस्या मांडल्या जात होत्या. रस्त्यांवरील वाहनांची पार्कींग, फुटपाथवरील दुकाने, हातठेले आदींमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या अनेक तक्रारी महापौरांपुढे मांडण्यात आल्या होत्या. शहरातील वाढत्या अतिक्रमणाच्या संदर्भात स्थायी निर्णय घेण्यासाठी महापौरांनी ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांच्या अध्यक्षतेत समिती गठीत करण्यात आली होती. या समितीचा अहवाल सभागृहामध्ये सादर केल्यानंतर मनपा आयुक्तांनी याबाबत सक्त पाउल उचलित कारवाई सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.मनपा आयुक्तांच्या निर्देशानुसार शहरातील रस्ते तसेच फुटपाथ मोकळे करण्यासाठी बुधवारपासून (ता.१) कठोर कारवाई केली जाणार आहे. विशेष म्हणजे, अतिक्रमणाच्या समस्येपासून नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी ही मोहिम तिव्रतेने राबविण्यात येणार असून. दिवसासह रात्रीही रस्ते व फुटपाथ मोकळे करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

### परिवहन समिती सभापतीपदी नरेंद्र बोरकर तर कर आकारणी समिती सभापतीपदी महेंद्र धनविजय यांची अविरोध निवड




नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन समिती सभापतीपदी नरेंद्र (बाल्या)बोरकर यांची तर कर आकारणी समिती सभापतीपदी महेंद्र धनविजय यांची अविरोध निवड करण्यात आली. शुक्रवारी (ता.२७)ला मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात पीठासीन अधिकारी जिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवडणूक प्रक्रीया पार पडली.मावळते परिवहन समिती सभापती बंटी कुकडे यांनी राजीनामा दिल्याने परिवहन समिती सभापतीपदी नरेंद्र बाल्या बोरकर यांची नियुक्ती करण्यात आली. परिवहन समिती सभापती पदा करिता नरेंद्र बाल्या बोरकर यांनी दोन नामनिर्देशन पत्र सादर केले होते. यापैकी एका नामनिर्देशनपत्रात सूचक म्हणून रूपा राय तर अनुमोदक विशाखा बांते, तर दुसऱ्या नामनिर्देशन पत्रात सूचक म्हणून नागेश सहारे तर अनुमोदक म्हणून रूपाली ठाकूर होते.कर आकारणी समिती सभापतीपदी यापूर्वी संदीप जाधव होते. संदीप जाधव यांची सत्तापक्षनेते पदी नियुक्ती झाल्याने महेंद्र धनविजय यांची नियुक्ती करण्यात आली. कर आकारणी समिती सभापती पदाकरिता महेंद्र धनविजय यांचेच एकच नामनिर्देशन प्राप्त झाले असून याकरिता सूचक म्हणून शिल्पा धोटे तर अनुमोदक म्हणून उज्वला शर्मा होते. नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी यापूर्वी नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती तसेच परिवहन समिती सभापती म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. महेंद्र धनविजय यांनी यापूर्वी दुर्बल घटक समिती सभापती म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. दोन्ही सभापतींची निवड झाल्यानंतर पीठासीन अधिकारी जिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे यांनी तुळशीचे रोपटे देऊन स्वागत केले. यावेळी उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक राजेश मोहिते उपस्थित होते.नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी यापूर्वी नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती तसेच परिवहन समिती सभापती म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. तथा परिवहन व्यवस्थापक राजेश मोहिते उपस्थित होते.

### अनधिकृत गतीरोधकाबाबत तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक

नागपूर शहरात म.न.पा. व विविध शासकीय यंत्रणेच्या मालकीच्या रस्त्यांवर विविध यंत्रणेव्दारे अनधिकृतपणे स्पिडब्रेकर चे बांधकाम करण्यात आलेले असून या अनधिकृत स्पिड ब्रेकरमुळे रहदारीला त्रास होत असल्यामुळे मा. आयुक्त, म.न.पा. यांचे आदेशानुसार म.न.पा. व इतर यंत्रणेच्या मालकीचे रस्ते असलेल्या प्राधिकरणाचे अधिकारी असे एकूण दहा अधिका–यांची समन्वय समिती गठित करण्यात आली असून उपायुक्त, म.न.पा. हे या समितीचे नोडल अधिकारी आहेत. म.न.पा. व विविध शासकीय यंत्रणेच्या मालकीच्या रस्त्यावरील अनधिकृत स्पिड ब्रेकर हटविण्याबाबत नागरीकांना तक्रार करण्याकरीता तक्रार निवारण केंद्राचा टोल फ्रि क्र. १८००२३३३७६४ आहे. करिता वरील बाबत नागरिकांनी कृपया या टोल फ्रि क्रमांकावर तक्रार करावी.

# स्वच्छ, सुंदर नागपूरसाठी उपद्रव शोध पथकाची कामगीरी महत्वाची : महापौर संदीप जोशी

## उपद्रव शोध पथकातील नवनियुक्त कर्मचा–यांना मार्गदर्शन

आपले नागपूर स्वच्छ व सुंदर व्हावे यासाठी महानगरपालिकेप्रमाणेच नागरिकांची जबाबदारीपूर्वक वागणूकी अत्यंत आवश्यकता आहे. नियमीत स्वच्छता करूनही अनेक ठिकाणी घाण होतेच. ही घाण आपल्या शहरातील नागरिकांकडूनच तयार होते. यावर शिस्तीचे अंकुश आवश्यक असून ते काम उपद्रव शोध पथकाद्वारे उत्तमरित्या पार पाडले जाते. स्वच्छ, सुंदर नागपूर ही संकल्पना पूर्णत्वास आणण्यासाठी मनपाच्या उपद्रव शोध पथकाची कामगिरी अत्यंत महत्वाची आहे, असे प्रतिपादन महापौर संदीप जोशी यांनी केले.मनपाच्या उपद्रव शोध पथकामध्ये नवनियुक्त कर्मचा–यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. महाल येथील मनपाच्या राजे रघुजी भोसले नगर भवन येथे आयोजित कार्यक्रमामध्ये महापौर संदीप जोशी यांच्यासह स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार, पथक प्रमुख वीरसेन तांबे आदी उपस्थित होते.

शहर स्वच्छतेसाठी नागरिकांची भूमिका महत्वाची आहे. मात्र त्यासाठी आधी मानसिकता बदलविणे गरजेचे आहे. एक नागरिक म्हणून आपली जबाबदारी काय ही जाणीव होणे आवश्यक आहे. उपद्रव पसरवून शहर विद्रुप करणा–यांवर कारवाई करून आतापर्यंत विविध ठिकाणी कारवाई करून लाखो रूपये दंड वसूल करण्यात आला आहे. पथकाचे हात बळकट करण्यासाठी नवीन ११४ कर्मचा–यांची भरती करण्यात आली आहे. आता २०१ संख्या असलेल्या पथकाद्वारे शहरात स्वच्छता राहावी यासाठी नागरिकांमध्ये शिस्त लावण्याचे कार्य होणार आहे. त्यामुळे पथकातील प्रत्येक कर्मचा–यानेही तेवढ्याच जबाबदारीने आपले कर्तव्य बजावावे, असे आवाहनही महापौर संदीप जोशी यांनी केले.अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी मनपाच्या शहरातील सुविधांच्या व्यवस्थापनाची माहिती दिली. पथकातील कर्मचा–यांनी नियोजनबद्ध पद्धतीने कसे कार्य करायचे याबाबतही मार्गदर्शन केले. नागरिकांना दंड ठोठावणे हा पथकाचा हेतू नसून उपद्रवींवर अंकुश लावून त्यांच्याकडून पुन्हा उपद्रव होणार नाही अशी कार्यवाही व्हावी, असेही ते म्हणाले.

### दहाही झोनमधून निघणार जनजागृती रॅली

शहरामध्ये स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी उपद्रव शोध पथकातील सर्व कर्मचा–यांद्वारे बुधवारी (ता.१) सकाळी ९ ते ११ वाजतादरम्यान प्रत्येक झोनमधून जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. उपद्रव शोध पथकामध्ये झोन निहाय पथक तैनात असून आतापर्यंत पथकामध्ये ८७ जणांचा समावेश होता. यामध्ये नव्याने निवड झालेल्या ११४ कर्मचा–यांची भर पडली आहे. दहाही झोनमध्ये झोन स्तरावरील पथकाद्वारे परिसरात जनजागृती रॅली काढून नागरिकांना शहर अस्वच्छ न करण्याबाबत आवाहन करण्यात येणार आहे.

### प्लास्टिक पतंग, मांजा, पुष्पगुच्छांच्या प्लास्टिकबाबत कारवाई सुरू

सिंगल यूज प्लास्टिक निर्मूलन अभियानांतर्गत उपद्रव शोध पथकाद्वारे प्लास्टिकच्या पतंग, नायलॉन मांजा तसेच पुष्पगुच्छांना लावण्यात येणा–या प्लास्टिकवरही कारवाईला मंगळवार (ता.३१)पासून सुरूवात झाली आहे. मंगळवारी (ता.३१) आसीनगर झोनमधील एका प्लास्टिक पतंग विक्रेत्यावर कारवाई करून २५ प्लास्टिक पतंग जप्त करण्यात आल्या व ५०० रूपये दंडही वसूल करण्यात आला आहे. पतंग विक्रेत्यांनी प्लास्टिकच्या पतंग तसेच नायलॉन मांजाची विक्री करणे थांबवावे तसेच पुष्पगुच्छ विक्रेत्यांनी पुष्पगुच्छांसाठी प्लास्टिकचा वापर बंद करावा असे आवाहन करण्यात आले. अन्यथा उपद्रव शोध पथकाद्वारे कारवाई करण्यात येईल, असा इशारा म.न.पा. तर्फे देण्यात आला आहे.

# सक्करदरा तलावाचे सौंदर्यीकरण लवकरच: महापौर

## मनपा अधिकाऱ्यासोबत केला पाहणी दौरा

सक्करदरा तलावाचे सौंदर्यीकरण लवकरच करणार असल्याचे महापौर संदीप जोशी यांनी सांगितले. सोमवारी (ता.३०) महापौर संदीप जोशी यांनी स्थानिक नगरसेवक व संबंधित अधिकारी यांच्यासमवेत सक्करदरा तलावाचा पाहणी दौरा केला व तेथील परिस्थिती जाणून घेतली.यावेळी त्यांच्यासमवेत उपमहापौर मनीषा कोठे, नेहरूनगर नगर झोन सभापती समिता चकोले, वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती उपसभापती नागेश सहारे, प्रतोद दिव्या धुरडे, नगरसेविका रिता मुळे, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार, कार्यकारी अभियंता अमीन अख्तर, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) मनोज गणवीर, कार्यकारी अभियंता (विद्युत) अजय मानकर, उप अभियंता रुपराव राऊत, कनिष्ठ अभियंता श्यामसुंदर ढगे, आर्किटेक्ट निशिकांत भिवगडे, कंत्राटदार ताहेर प्रामुख्याने उपस्थित होते. महापौरांनी सक्करदरा तलावाची पाहणी केली. नव्या सौंदर्यीकरणासंदर्भातील सर्व माहिती कार्यकारी अभियंता अमीन अख्तर आणि निशिकांत भिवगडे यांनी दिली. यावेळी त्यांनी प्रस्तावित विकास कामांचे नकाशे महापौरांपुढे सादर केले. यामध्ये तलावाभवती संरक्षक भिंत, तलावाच्या एका बाजूस उद्यानात, एका बाजूस राजे रघूजी भोसले यांच्या जीवनावर आधारित म्युरल व त्यांचा जीवनपट असणार असल्याची माहिती त्यांनी दिली. एका बाजूस फुट कोर्ट, प्रशस्त उद्यान असणार आहे. तलावाच्या सभोवताल चालणाऱ्यांसाठी जॉगिंग ट्रॅक तयार करणार आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. या सर्व कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कार्यादेश देण्याच्या मार्गावर काम आहे. लवकरात लवकर कार्यादेश वितरित करून प्रत्यक्ष कामाला सुरूवात होईल, असे अधिकाऱ्यांनी महापौरांना सांगितले. सक्करदरा तलावासंदर्भात शासनाद्वारे अनेकवेळा पाठपुरावा करून निधी मागण्यात आला होता. तलवाच्या सौंदर्यीकरणासाठी शासनाद्वारे निधी आलेला आहे. आधीच उशीर झाला आहे, आता कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, असे निर्देश महापौर संदीप जोशी यांनी दिले. तलावाच्या आतील स्वच्छतेच्यासंदर्भात काय उपाययोजना करता येईल याचाही विचार करण्यात यावा, असेही महापोरांनी सांगितले. तलावाच्या सभोवताल ७ ते ८ फुटाची सरंक्षक जाळी लावण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली, जेणेकरून तलावात कोणीही कचरा टाकणार नाही.

## म्हैसूर शहराचे महापौर, उपमहापौर, जिल्हाधिकारी, आयुक्तांची नागपूर शहराला भेट

### महापौर संदीप जोशी यांनी केले स्वागत : भांडेवाडी येथील 'बायो रिमेडीएशन' प्रकल्पाची केली पाहणी'

कर्नाटकमधील म्हैसूर शहराच्या महापौर पुष्पलता जगन्नाथ, उपमहापौर शफी अहमद, जिल्हाधिकारी अभिराम जी.शंकर, आयुक्त गुरूदत्त हेगडे यांनी सोमवारी (ता.३०) अभ्यास दौ–यांतर्गत नागपूर शहराला भेट दिली.महापौर कक्षामध्ये महापौर संदीप जोशी यांनी सर्व मान्यवरांसह शिष्टमंडळाचे तुळशी रोप देउन स्वागत केले व शहरातील प्रकल्पांसंदर्भात चर्चा केली. याशिवाय आयुक्त कक्षामध्ये आयुक्त अभिजीत बांगर यांनीही सर्व मान्यवरांशी संवाद साधला. शिष्टमंडळामध्ये म्हैसूरचे महापौर, उपमहापौर, जिल्हाधिकारी, आयुक्त यांच्यासह म्हैसूर महापालिकेच्या वित्त समिती अध्यक्ष श्रीमती शोभा, आरोग्य अधिकारी डॉ.जयनाथ एम.एस., अरोग्या अधिकारी डॉ.डी.जी. नागराज यांचा समावेश होता. अभ्यास दौ–यादरम्यान मान्यवरांनी भांडेवाडी येथे सुरू असलेल्या 'बायो रिमेडीएशन' प्रकल्पाची पाहणी केली. प्रकल्पासंदर्भात मनपा उपअभियंता राजेश दुफारे यांनी सादरीकरण केले. झिग्मा ग्लोबल एनव्हान्स सोल्यूशन प्रा.लि.चे संचालक नागेश प्रभू यांनी प्रकल्पाची माहिती दिली. भांडेवाडी येथे नागपूर महानगरपालिकेतर्फे ५३ एकरमध्ये प्रकल्प राबविण्यात येत आहे. भांडेवाडीतील कच–यावर प्रक्रिया करणारा हा प्रकल्प असून या कच–यामधून काच, लोखंड, टायर आदींवर पुनर्प्रक्रिया केली जाते तर माती व दगड वेगळे केले जाते. इतर कच–यावर प्रक्रिया करून तो कचरा आरडीएफ या सीमेंट कंपनीला देण्यात येतो. संपूर्ण प्रकल्पापैकी आतापर्यंत तीन एकरमधील कच–यावर प्रक्रिया करण्याचे काम झाले असल्याची माहिती झिग्मा ग्लोबल एनव्हान्स सोल्यूशन प्रा.लि.चे संचालक नागेश प्रभू यांनी यावेळी दिली. म्हैसूर शहराची लोकसंख्या सुमारे १० लाख असून महापालिकेमध्ये ६५ नगरसेवक प्रतिनिधीत्व करतात. शहरातील सुमारे २ लाख टन कचरा १७ ते २० एकरांमध्ये आहे. स्वच्छ सर्व्हेक्षणमध्ये म्हैसूर शहर तिस–या क्रमांकावर असून कच–याचे व्यवस्थापन आणि प्रक्रिया यासंदर्भात वेगवेगळ्या शहरांमध्ये अभ्यास दौरा करण्यात आला. नागपूर शहरात राबविण्यात येत असलेला 'बायो रिमेडीएशन' प्रकल्प इतर शहरातील प्रकल्पांपेक्षा उत्तम आहे. या प्रकल्पाची म्हैसूर शहरात अंमलबजावणी व्हावी यासाठी कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी म्हैसूर महापालिकेचे आयुक्त गुरूदत्त हेगडे यांनी दिली. प्रकल्पाशी संबंधीत प्रशासकीय व कायदेशीर बाबींसंदर्भातही मान्यवरांनी चर्चा केली.



## महापौरांच्या हस्ते प्रतिभावंत कुस्तीपटू सन्मानित

### ६३व्या राज्य कुस्ती अधिवेशनासाठी शहरातील सहा पैलवांनाची निवड

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष गणेश कोहळे, सभासद दिलीप महाजन, नागपूर कुस्ती अकादमीचे उपाध्यक्ष दयाराम भोतमांगे यांच्यासह शहरातील प्रतिभावंत कुस्तीपटू विदर्भ केशरी निकीता लांजेवार व विदर्भ केशरी महेश काळे यांना महापौरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सोमवारी (ता.३०) महापौर कक्षामध्ये महापौर संदीप जोशी यांनी तुळशी रोपटे देउन कुस्तीपटूंना सन्मानित केले. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेवर नागपूर जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून शहरातील गणेश कोहळे यांची उपाध्यक्ष तर दिलीप महाजन यांची सभासद म्हणून निवड करण्यात आली. तर नागपूर कुस्ती अकादमीचे उपाध्यक्षपदी दयाराम भोतमांगे यांची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे नागपूर कुस्ती अकादमीचे महापौर संदीप जोशी अध्यक्ष आहेत. यासोबतच येत्या २ ते ७ जानेवारीदरम्यान बालेवाडी, पुणे येथे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे ६३वे राज्य कुस्ती अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनामध्ये नागपूर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणा–या सहा प्रतिभावंत खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये महिला गटात विदर्भ केशरी निकीता लांजेवार यांच्यासह पुरूष गटात विदर्भ केशरी महेश काळे (६१ किलो वजनगट), अनिकेत हजारे (५७ किलो), हिमांशू लांजेवार (६५ किलो), चेतन घारगाटे (७४ किलो) आणि अमन तिवारी (६५ किलो) यांची निवड करण्यात आली आहे. नागपूर जिल्हा कुस्ती संघाचे प्रतिनिधीत्व करणा–या या खेळाडूंचे प्रशिक्षक म्हणून रामा येंगड, गोवर्धन वरठी, सुनील गाडगीलवार भूमिका बजावणार आहेत. सर्व खेळाडूंचे प्रतिनिधी म्हणून महापौर संदीप जोशी यांच्या हस्ते निकीता लांजेवार व महेश काळे या दोन्ही विदर्भ केशरी कुस्तीपटूंना सन्मानित करण्यात आले. येणा–या स्पर्धेसाठी महापौरांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या तसेच राज्य कुस्तीगीर परिषदेवर आणि नागपूर कुस्ती अकादमीवर निवड झालेल्या पदाधिका–यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर कमिटीचे सहसचिव रमेश खाडे, सचिव बुधाजी सुलकार, आंतरराष्ट्रीय पंच तसेच माजी जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप इटनकर, कुस्तीपटू अंशीता मनोहरे, रश्मी मनोहरे, रोहित शेंडे, भूषण भोतमांगे, सुरज खटाना, करण चव्हीाण आदी उपस्थित होते.

# महापौरांच्या हस्ते आरपीटीएस रोडवर वृक्षारोपन

## वृक्ष संवर्धन आणि सुरक्षेसाठी 'सेल्फ वाटरींग सिस्टीम'

महापौर संदीप जोशी यांच्या हस्ते मंगळवारी (ता.३१) आरपीटीएस मार्गावर वृक्षारोपन करण्यात आले. वृक्ष संवर्धन आणि सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त अशी 'सेल्फ वाटरींग सिस्टीम' असलेल्या कडूनिंबाच्या रोपांची यावेळी लागवड करण्यात आली.याप्रसंगी स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती सभापती तारा (लक्ष्मी) यादव, नगरसेवक लखन येरवार, नगरसेविका वनिता दांडेकर, उपायुक्त राजेश मोहिते, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार, उद्यान निरीक्षक अनंता नागमोते कनिष्ठ अभियंता पी.आर. उकेबांते, नागपूर शहर सौंदर्यीकरण समितीचे समन्वयक दिलीप चिंचमलातपुरे, 'सेल्फ वाटरींग सिस्टीम' विकसीत करणारे गौरव टावरी व सतीश टावरी, परिसरातील नागरिक विश्वास सहस्त्रबुद्धे, मुकुंद जोशी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी प्रशांत जोशी, बाबा देशपांडे, रोहित देशपांडे, श्रीकांत देशपांडे, ग्रीन व्हितजील फाउंडेशनचे कौस्तभ चॅटर्जी, सुरभी जयस्वाल, अनिल राठी आदी उपस्थित होते.वृक्ष संवर्धन आणि सुरक्षेसाठी 'सेल्फ वाटरींग सिस्टीम' नागपूर शहरामध्ये दरवर्षी ११ हजार झाडे लावण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे एखाद्या रोडवर कोणत्याही एकाच प्रजातीच्या झाडांची लागवड केली जाणार आहे. अजनी चौकाकडे जाणा–या आरपीटीएस रोडवर पूर्णत: कडूनिंबाच्याच झाडांची लागवड करण्यात आली आहे. प्राधान्याने सीमेंट रोडच्या बाजूला वृक्षारोपन केले जात आहे. वृक्षारोपन केल्यानंतर त्यांच्या देखभालीची मोठी जबाबदारी असते. त्यादृष्टीने 'सेल्फ वाटरींग सिस्टीम'चा यामध्ये अवलंब करण्यात आला आहे. या प्रणालीद्वारे वृक्षारोपन केल्यानंतर दोन वर्षपर्यंत झाडांच्या देखभालीची जबाबदारी संबंधित प्रणाली विकसीत करणा–यांची आहे. कमी पाण्यामध्ये झाडांच्या झटपट वाढासाठी पोषक तसेच त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही उपयुक्त 'सेल्फ वाटरींग सिस्टीम'द्वारे हे वृक्षारोपन करण्यात आले. देशात पहिल्यांदाच वृक्षारोपनासाठी या प्रणालीचा अवलंब केला जात आहे. या प्रणालीमुळे १० ते १५ दिवसात एकदाच झाडांना पाणी टाकावे लागते. पाण्याची नासाडी न होता. टाकलेले पाणी थेट रोपट्याच्या मुळापर्यंत पोहोचते. त्यामुळे झाडांची वाढही चांगली होते. या प्रणालीमुळे सुमारे ६० ते ७० टक्के पाण्याची बचत करता येते. नागपूर शहरातील उन्हाळ्यातील तापमान लक्षात घेत झाडांच्या संरक्षणानुसार प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे वर्षभरात केव्हाही वृक्षारोपन करता येउ शकते. विशेष म्हणजे झाडांना लावण्यात येणा–या ट्रीगार्डच्या किंमतीच्या तुलनेत 'सेल्फ वाटरींग सिस्टीम'ची किंमत कमी आहे. पाणी बचतीसह संरक्षणाच्यादृष्टीने सदर प्रणाली उपयुक्त असल्याची माहिती यावेळी गौरव टावरी यांनी दिली. शहरातील नागरिक म्हणून प्रत्येकाने वृक्षसंवर्धन करणे आवश्यक आहे. रोडच्या बाजूला वाहन उभी करताना बाजुला असलेल्या झाडांना इजा पोहोचणार नाही याची काळजी घ्यावी. नव्याने वृक्षारोपन करण्यात आलेल्या झाडांची पाने तोडू नये ती तोडताना कुणी आढळल्यास त्यांना मज्जाव करण्यात यावा, असे आवाहन मनपा उद्यान विभागातर्फे करण्यात आले आहे.

# थोडक्यात...

## ‘ते’ पाच बेजबाबदार शिक्षक निलंबित

### शाळा पाहणी दौऱ्यात बेजबाबदारपणा आढळल्याने प्रशासनाने केली कारवाई

नागपूर महानगरपालिकेच्या शाळेतील पाच शिक्षकांना मनपा प्रशासनाने कारवाई करत अखेर निलंबित केले. मंगळवारी ही कारवाई मनपा प्रशासनाद्वारे करण्यात आली. काही दिवसांपूर्वी उपमहापौर मनीषा कोठे, शिक्षण समिती सभापती प्रा.दिलीप दिवे, उपसभापती प्रमोद तभाने यांनी गिट्टीखदान शाळा व एकात्मतानगर शाळेत शाळेचा आकस्मिक पाहणी दौरा केला होता.पाहणी दौऱ्याप्रसंगी पदाधिकाऱ्यांना शाळेतील शिक्षक बेजबाबदार आढळले असता त्यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश उपमहापौरांनी दिले होते. मनपा प्रशासनाने या निर्देशाची अंमलबजावणी करत शिक्षण विभागातील निरीक्षक, मुख्याध्यापकासह शिक्षकांना निलंबित केले. यामध्ये गिट्टीखदान मराठी प्रा. शाळेच्या सहा.शिक्षिका रेवती कडू, सहा.शिक्षिका ललिता गावंडे, सहा.शिक्षिका शारदा खंडारे, प्रभारी मुख्याध्यापक देवमन जामगडे, झोनचे शाळा निरीक्षक धनराज दाभेकर या अधिकारी व शिक्षकांचा समावेश आहे. या पाच अधिकारी व शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आला होता. परंतू या अधिकारी व शिक्षकांनी दिलेली कारणे समाधानकारक नसल्याने विभागाने ही कारवाई केली.पदाधिकाऱ्यांनी पाहणी दौऱ्याप्रसंगी अनुपस्थित विद्यार्थ्यांची हजेरी दाखवणे, शाळेचा अभ्यासक्रम पूर्ण न करणे, वह्या पुस्तके, व्यवसायमाला यामध्ये ही गोंधळ असणे, पहिल्या सत्राचा निकाल न लावणे अशा प्रकारचे धक्कादायक प्रकार समोर आले होते. या सर्वांवर पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त करत तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.या पाच अधिकारी व शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आला होता. परंतू या अधिकारी व शिक्षकांनी दिलेली कारणे समाधानकारक नसल्याने विभागाने ही कारवाई केली. शाळेचा अभ्यासक्रम पूर्ण न करणे, वह्या पुस्तके, व्यवसायमाला यामध्ये ही गोंधळ असणे, या सर्वांवर पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त करत तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.

## १०२ कोटींच्या वसुलीकरिता ८३६ खाते गोठविले

### मनपाच्या स्थानिक संस्था कर विभागाची कार्यवाही

नागपूर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाद्वारे वसुली मोहीम तीव्र करण्यात आली आहे. सुमारे १०२ कोटींच्या वसुलीकरिता ८३६ व्यावसायिकांचे बँक खाते गोठविण्यात आले आहेत.मनपाच्या स्थानिक संस्था कर विभागाद्वारे आर्थिक वर्ष २०१३–१४ करिता व्यावसायिकांनी सादर केलेल्या विवरणपत्रांच्या निर्धारणांती ६३८ प्रकरणांत ८१ कोटी ६६ लाख ८४ हजार ३५५ रुपयांची मागणी निर्धारीत करण्यात आलेली आहे. आर्थिक वर्ष २०१४–१५ करिता सादर केलेल्या विवरणपत्रांच्या निर्धारणांती १९८ प्रकरणांत २० कोटी २६ लाख ५८ हजार ३०४ रुपयांची मागणी निर्धारीत करणञयात आलेली आहे. अशा एकूण ८३६ प्रकरणांत १०१.९३ कोटी रुपयांची मागणी आहे. व्यावसायिकांनी सदरहू निर्धाणांची दखल न घेतल्याने स्थानिक संस्था कर विभागाद्वारे संबंधित व्यावसायिकांचे बँक खाते गोठवून वसुलीची कार्यवाही प्रभावी करण्यात आली असल्याची माहिती स्थानिक संस्था कर विभागाचे सहायक आयुक्त मिलिंद मेश्राम यांनी दिली.



## बाजारातील दुकानदारांकडून आकारणार स्वच्छता शुल्क शुल्क आकारणीसाठी गठीत समितीची बैठक

नागपूर शहर स्वच्छतेच्या दिशेने एक–एक पाऊल पुढे टाकत आहे. आता बाजारातून निघणाऱ्या कचऱ्याची उचल करण्यासाठी बाजारातील प्रत्येक दुकानदारांकडून स्वच्छता शुल्क आकारण्यात येणार आहे. यासंदर्भात विधी समितीचे सभापती ड. धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेत गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक मनपा मुख्यालयाच्या डॉ. पंजाबराव स्मृती सभागृहात गुरुवारी (ता. १९) पार पडली. बैठकीला समितीचे अध्यक्ष ड. धर्मपाल मेश्राम यांच्यासह समितीच्या सदस्य मनीषा धावडे, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, सहायक आयुक्त विजय हुमणे, विधी अधिकारी व्यंकटेश कपले, बाजार अधीक्षक श्रीकांत वैद्य उपस्थित होते. यावेळी समितीचे अध्यक्ष ड. धर्मपाल मेश्राम यांनी नागपूर शहरात असलेल्या अधिकृत आणि अनधिकृत बाजार, आठवडी बाजारांचा आढावा घेतला. या बाजारांमधून निघणारा कचरा किती, शासनाचा अध्यादेश काय, बाजारातील दुकानदारांकडून स्वच्छता शुल्कापोटी किती रक्कम आकारण्यात यायला हवी आदीबाबत चर्चा केली. यापुढे बाजारातील व्यावसायिक, हॉकर्स यांची एकत्रित माहिती सादर करून तातडीने तात्पुरती दरनिश्चिती करण्यात यावी. स्वच्छता शुल्क आकारणी तातडीने लागू करण्यात यावी, असे निर्देश समितीचे अध्यक्ष ड. धर्मपाल मेश्राम यांनी दिले. बैठकीला विषयाशी संबंधित अन्य अधिकारी उपस्थित होते.

## अवैध टॉवर्सना नोटीस देउन कारवाई करा!

### ज्येष्ठ नगरसेवक संजय बंगाले यांचे निर्देश

शहरात अनेक ठिकाणी मोबाईल टॉवर्स उभारण्यात आलेली आहेत. यामध्ये मागील एक ते दीड वर्षात अनेक अवैध टॉवर्स उभारली गेली आहेत. मनपाकडून अशा टॉवर्स कंपन्यांच्या प्रतिनिधींशी वारंवार चर्चा करून त्यांना आवश्यक कार्यवाहीसाठी निर्धारित वेळ देण्यात आला. मात्र अद्यापही कोणतिही कार्यवाही न झाल्याने अवैध टॉवर्स कंपन्यांना मनपा कायद्यानुसार कलम ५३ व ५४ ची नोटीस बजावून त्यांच्यावर कारवाई करा, असे निर्देश ज्येष्ठ नगरसेवक संजय बंगाले यांनी दिले. शहरातील मोबाईल टॉवरबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता महापौर संदीप जोशी यांच्या निर्देशानुसार गुरूवारी (ता.१९) मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील आयुक्त सभागृहामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत ज्येष्ठ नगरसेवक संजय बंगाले यांच्यासह उपायुक्त राजेश मोहिते, सहायक संचालक (नगररचना) प्रमोद गावंडे, सहायक आयुक्त सर्वश्री प्रकाश वराडे, अशोक पाटील, हरीश राउत, गणेश राठोड, सहायक आयुक्त स्नेहा करपे, किरण बगडे, नगररचना उपअभियंता श्रीकांत देशपांडे यांच्यासह इंड्स टॉवर, रिलायन्स जिओ, टॉवर व्हि जन, एटीसी, ए.आर. कॉम टेलिव्हें चर, यूनिटी या कंपन्यांचे कन्सल्टंट उपस्थित होते. शहरातील मोबाईल टॉवर कंपन्यांवरील थकीत कर वसूली संदर्भात वेळोवेळी टॉवर कंपन्यांच्या प्रतिनिधींशी बैठक घेउन त्यांना माहिती देण्यात आली. याशिवाय अवैध टॉवरबाबत आवश्यक कार्यवाही करून त्यासंदर्भात आवश्यक परवानगी घेण्याबाबतही मागील बैठकीत ठराविक कालावधी देण्यात आले. मात्र त्यानंतरही कंपन्यांकडून कोणतिही कार्यवाही न होत असल्याने आता झोननिहाय ठराविक कंपन्याच्या टॉवरची यादी तयार करण्यात यावी. यानंतर अवैधरित्या आढळणा–या टॉवरसंदर्भात ज्या घरमालकाकडे असे टॉवर उभारण्यात आले आहे. अशा घरमालकांना मनपा कायद्याच्या कलम ५३ व ५४ अन्वये अवैध बांधकामाचेच नोटीस देण्यात यावे व टॉवरवरील विद्युत पुरवठा खंडीत करावा, असे निर्देश यावेळी ज्येष्ठ नगरसेवक संजय बंगाले यांनी दिले.

# नागपुर स्मार्ट सिटींचे प्रकल्प बाधींतांना भाड्याने घर घेण्यासाठी मिळणार रू ५००० प्रतीमाह

नागपूर स्मार्ट आणि सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन च्या संचालक मंडळाची सभा नागपूर येथे आज (३१ डिसेंबर) संपन्न झाली नागपूर स्मार्ट सिटी चे मेंटोर आणि चेयरमेन, बहन्मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त श्री. प्रविण परदेशी अध्यक्ष स्थानी होते. यावेळी महापौर श्री. संदीप जोशी, स्थायी समिती सभापती श्री. प्रदीप पोहाणे, सत्ता पक्ष नेता श्री. संदीप जाधव, बसपा पक्ष नेता श्रीमती वैशाली नारनवरे, नगरसेविका श्रीमती मंगला गवरे, पोलीस आयुक्त डॉ. भुषण उपाध्याय, आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी श्री. रविन्द्र ठाकरे, संचालक श्री. अनिरूध्द शेणवाई आदि उपस्थित होते. सभेस आमदार श्री. कृष्णा खोपडे, उपमहापौर श्रीमती मनिषा कोठे विशेष निमंत्रित म्हणून होते.स्मार्ट सिटी चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे यांनी महापौर श्री. संदीप जोशी, उपमहापौर श्रीमती मनिषा कोठे सत्तापक्ष नेते श्री. संदीप जाधव, ब.स.पा.पक्ष नेत्या श्रीमती वैशाली नारनवरे आणि जिल्हाधिकारी श्री. रविन्द्र ठाकरे श्री. दिपक कोचर यांची संचालक मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे स्वागत केले.श्री.प्रविण परदेशी यांनी प्रोजेक्ट टेंन्डर शुअर च्या अंमलबजावणी साठी लोकप्रतिनीधी आणि प्रकल्पग्रस्त सहकार्य करीत असल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीस गती प्राप्त होत असल्यामुळे समाधान व्यक्त केले व सदर प्रकल्प पथदर्शी असल्यामुळे नागपुर शहरातील इतर अविकसित भागात देखिल राबवीण्यात यावा तसेच रस्त्याचे निर्माण कार्य लवकरात लवकर पुर्ण करावे असे निर्देश दिले.नागपूर स्मार्ट सिटी च्या वतीने पारडी भरतवाडा पुनापूर आणि भांडेवाडी क्षेत्रात १० किमी मार्गाचे निर्माण कार्य सुरु केले आहे. या क्षेत्रात लोकांना पिण्याचे पाणी देण्यासाठी ४ ओव्हरहेड टाकीचे निर्माण कार्य प्रारंभ केले आहे. नाग नदी वर लहान आणि मोठया पुलाचे बांधकाम सुध्दा सुरु करण्यात आले आहे.




## मनपा महिलांसाठी ‘ तीं बस ’ टॉयलेट निर्माण करणार

### दोन टॉयलेट प्रायोगिक तत्तावर लवकरच सुरू करणार

नागपूर महानगरपालिकेच्या जुन्या भंगार बसेसचा पुनर्वापर करून महिलांसाठी खास ती बस टॉयलेटचे निर्माण करणार असल्याची माहिती महापौर संदीप जोशी यांनी दिली. या योजनेची माहिती जाणून घेण्यासाठी महापौरांनी बुधवारी (ता.१८) मनपा मुख्यालयातील महापौर कक्षात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी महापौर संदीप जोशी यांच्यासह आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार, परिवहन विभागाचे यांत्रिकी अभियंता योगेश लुंगे, साराप्लास्ट इंटरप्राईजेसचे शेखर कांत, संदीप जाट प्रामुख्याने उपस्थित होते. मनपाद्वारे सुलभ शौचलाये निर्माण करण्यात आलेले आहे. पंरतु वर्दळी भागात, आठवडी बाजारात महिलांसाठी शौचालयासाठी अडचणी जातात. महिलांसाठी शौचालये उपलब्ध व्हावी यादृष्टीने परिवहन विभागाच्या जुन्या भंगार पडलेल्या बसेसेचा योग्य पुनर्वापर करून महिलांसाठी टॉयलेट बस निर्माण करण्यात येत असल्याचे महापौरांनी सांगितले. या बसेस ला ‘ती बस’ असे नाव देण्यात येणार आहे. प्रारंभीच्या काळात प्रायोगिक तत्तावर दोन बसेस लवकरात लवकर सुरू करण्यात येणार आहे. एक बस ही फिरती राहणार असून ही बस शहरातील वर्दळींच्या ठिकाणी व आठवडी बाजारात, मार्केट परिसरात राहणार असून एक बस ही राहटे कॉलनी चौकात स्थीर राहणार आहे. अशा ५० बसेस मनपा निर्माण करणार आहे.या बसेसमध्ये महिलांसाठी स्वच्छतागृह राहणार असून उरलेल्या थोड्या जागेत उपहारगृह ठेवण्यात येणार आहे. यामध्ये महिलांसाठी चहा, नास्ताची सोय त्यात राहील, अशी माहिती शेखर कांत यांनी दिली.अशा प्रकारच्या बसेसमुळे महिलांसाठी शौचालयाचा प्रश्न सुटेल, असा विश्वास महापौरांनी यावेळी व्यक्त केला. दोन टॉयलेट बसेस लवकरात लवकर सुरू करावयात, असेही महापौरांनी यावेळी सांगितले. एक बस ही फिरती राहणार असून ही बस शहरातील वर्दळींच्या ठिकाणी व आठवडी बाजारात, मार्केट परिसरात राहणार असून एक बस ही राहटे कॉलनी चौकात स्थीर राहणार आहे. अशा ५० बसेस मनपा निर्माण करणार आहे. यामध्ये महिलांसाठी चहा, नास्ताची सोय त्यात राहील, अशी माहिती शेखर कांत यांनी दिली.अशा प्रकारच्या बसेसमुळे महिलांसाठी शौचालयाचा प्रश्न सुटेल, असा विश्वास महापौरांनी यावेळी व्यक्त केला. दोन टॉयलेट बसेस लवकरात लवकर सुरू करावयात, असेही महापौरांनी यावेळी सांगितले.

## खासगी प्रवासी बस शहराबाहेर थांबण्याच्या प्रक्रीयेला सुरूवात

### प्रवीण दटके यांच्या अध्यतेखाली गठीत समितीची बैठक

शहरातील सर्व खासगी बसेस शहराबाहेर थांबण्याच्या प्रक्रीयेला महानगरपालिकेद्वारे सुरूवात झाली आहे. यासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी महानगरपालिकेने प्रवीण दटके यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून या समितीची पहिली बैठक गुरूवारी (ता.२६) रोजी मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आली.यावेळी समिती सदस्य सुनील अग्रवाल, संदीप गवई, संजय बुर्रेवार, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, उपायुक्त राजेश मोहिते, सहायक आयुक्त अशोक पाटील, प्रकाश वराडे, वाहतूक विभागाचे कार्य. अभियंता शकिल नियाजी, परिवहन विभागाचे रवींद्र पागे, योगेश लुंगे, यांच्यासह स्थावर विभागाचे संबंधित अधिकारी, पोलिस विभागाचे पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक प्रामुख्याने उपस्थित होते.शहरात खासगी बसेस, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस, शाळेच्या बसेस, शहराच्या परिवहन विभागाच्या बसेस अशा चार प्रकारच्या बसेस वदर्ळीच्या ठिकाणांवरून ये –जा करत असतात. या बसेसचे शहरात ठिकठिकाणी थांबे असल्याने त्या बराच काळ तेथे उभ्या असतात. यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. वाहतूकीला अडथळा निर्माण होतो. या वाहतूक कोंडीला रेखण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने नवे धोरण निश्चित केले आहे. याबाबत महानगरपालिकेच्या ७ डिसेंबरच्या विशेष सभेत महापौर संदीप जोशी यांनी याबाबत निर्देश दिले होते.शहराच्या बाहेर खासगी प्रवासी बसेसला पार्किंगसाठी जागा उपलब्ध करण्यासाठी उमरेड रोड व वर्धारोड वरील नागपूर मेट्रो प्राधिकरण, नागपूर सुधार प्रन्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणला पत्र पाठवावे, असे निर्देश प्रवीण दटके यांनी दिले. या खासगी बसेससाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत धोरण निश्चित करावे. खासगी बसेसचे शहरात ज्याठिकाणी बुकींग सेंटर आहे, त्या ठिकाणी मनपाच्या परिवहन विभागामार्फत बसेस पुरविण्यात येईल का, यबाबातचा अहवाल पाहणी करून परिवहन विभागाने सादर करावा. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत कायद्यामध्ये काही तरतुदी आहे का याचीही पडताळणी करावी, अशी सूचना प्रवीण दटके यांनी केली. पोलिस वाहतूक विभाग यांच्याशी संपर्क साधून कायद्यानुसार कार्यवाही करावी.

## उत्पन्न वाढीबाबत सर्वांना सोबत घेउन कार्य करणार

### नवनिर्वाचित कर संकलन व कर आकारणी समिती सभापती महेंद्र धनविजय यांचे प्रतिपादन

नागपूर महानगरपालिकेचे सर्वात मोठे उत्पन्नाचे स्त्रोत कर हे आहे. कर वसुली संदर्भात मनपातर्फे अनेक कारवाया करण्यात येत आहेत. मात्र तरीही कर वसुलीमधून उत्पन्न वाढीसाठी आवश्यक उपाययोजनांची आवश्यकता आहे. पदभार स्वीकारल्यापासून अवघे तीन महिने हातात आहेत. त्यामुळे अतिशय कमी वेळेमध्ये मोठे उद्दीष्ट गाठायचे आहे. त्यामुळे सर्वांना सोबत घेउन सहकार्याने कार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन नवनिर्वाचित कर संकलन व कर आकारणी समिती सभापती महेंद्र धनविजय यांनी केले. महेंद्र धनविजय यांनी कर संकलन व कर आकारणी समिती सभापती म्हणून पदभार स्वीकारला. मनपा मुख्यालयातील कर संकलन व कर आकारणी समिती सभापती कक्षामध्ये झालेल्या पदग्रहण समारंभात महापौर संदीप जोशी, पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे, मध्य नागपूरचे आमदार विकास कुंभारे, उपमहापौर मनीषा कोठे, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, मावळते कर संकलन व कर आकारणी समिती सभापती व विद्यमान सत्तापक्ष नेते संदीप जाधव, स्थापत्य समिती सभापती अभय गोटेकर, महिला व बालकल्याण समिती सभापती संगीता गि–हे, लक्ष्मीनगर झोन सभापती प्रकाश भोयर, धरमपेठ झोन सभापती अमर बागडे, धंतोली झोन सभापती लता काडगाये, समिती सदस्या रुपा राय, मनिषा धावडे, मनिषा अतकरे, विशाखा बांते, रुपाली ठाकुर, समिती सदस्य सर्वश्री दिपक वाडिभस्मे, नितीन साठवणे, नागेश मानकर, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेवक सर्वश्री नागेश सहारे, सुनील हिरणवार, नगरसेविका शिल्पा धोटे, सरीता कावरे, रेखा साकोरे, उज्वला शर्मा, निरंजना पाटील, माजी सत्तापक्ष नेते प्रा.प्रमोद पेंडके आदी उपस्थित होते.यावेळी महापौर संदीप जोशी, आमदार कृष्णा खोपडे, आमदार विकास कुंभारे, उपमहापौर मनीषा कोठे, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, कर संकलन व कर आकारणी समिती सभापती व सत्तापक्ष नेते संदीप जाधव यांनी तुळशी रोप देउन नवनिर्वाचित सभापतींचा सत्कार केला व त्यांचे अभिनंदन केले. यावेळी माजी कर संकलन व कर आकारणी समिती सभापती संदीप जाधव यांनी मागील कार्यकाळातील कामाची माहिती दिली. कर वसुली संदर्भात मनपातर्फे अनेक कठोर पाउल उचलण्यात आले आहेत. थकीत कर वसुलीसंदर्भात पहिल्यांदाच मनपातर्फे लिलावाची कारवाई करण्यात आली. नुकतेच स्थानिक संस्था कराचे वसुलीसाठी बँक खाते सिज करण्याचीही कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे मनपाचे उत्पन्न वाढविण्यासाठी पुढेही अशा कारवाया व्हाव्यात अशी अपेक्षा माजी कर संकलन व कर आकारणी समिती सभापती व विद्यमान सत्तापक्ष नेते संदीप जाधव यांनी केली.

## जुन्या कलेक्शन सेंटरवर कचरा आढळल्यास नव्या एजन्सीवर कारवाई

### आरोग्य समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा यांचा इशारा

शहरात स्वच्छतेसाठी दोन नवीन एजन्सी नियुक्त केल्या आहेत. जुन्या एजन्सीमार्फत शहरात अनेक ठिकाणी कलेक्शन सेंटर तयार करण्यात आले होते. या कलेक्शन सेंटरवर दिवसभर अस्वच्छता असायची. त्यामुळे नवीन नियुक्त एजन्सींमार्फत हे कलेक्शन सेंटर बंद करण्याचे आधीच स्पष्ट करण्यात आले होते. त्यामुळे अजूनही जर जुन्या कलेक्शन सेंटरवर कचरा आढळल्यास दोन्ही नव्या एजन्सीवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा आरोग्य समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा यांनी दिला. आरोग्य विभागच्या विविध विषयांच्या अनुषंगाने गुरूवारी (ता.२६) मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहामध्ये आरोग्य विशेष समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा, उपसभापती नागेश सहारे, सदस्य लहुकुमार बेहते, कमलेश चौधरी, संजय बुर्रेवार, सदस्या लीला हाथीबेड, विशाखा बांते, सरीता कावरे, आशा उईके, उपायुक्त निर्भय जैन, आरोग्य उपसंचालक डॉ.भावना सोनकुसळे, अतिरिक्त सहायक आरोग्य अधिकारी डॉ.विजय जोशी, पशुचिकित्सक अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, हत्तीरोग अधिकारी जयश्री थोटे, विधी अधिकारी व्यंकटेश कपले, टाटा ट्रस्टचे डॉ.टिकेश बिसेन यांच्यासह दहाही झोनचे झोनल अधिकारी व ए.जी. एन्व्हायिरो व बी.व्हीप.जी. या दोन्ही एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत गाईचे गोठे असलेल्या ठिकाणी शेण, मलमूत्र उचलण्याबाबत जबाबदारी संदर्भात धोरण निश्चीत करणे, शहरातील लहान व मोठ्या जनावरांच्या अवैध कत्तलीबाबत धोरण निश्चीत करणे, सफाई कर्मचारी, जमादार स्वास्थ निरीक्षक, झोनल आरोग्य अधिकारी आणि सहायक आयुक्त यांच्या साफ सफाईमध्ये संपूर्ण कार्यप्रणाली निश्चीत करण्याबाबत धोरणात्मक चर्चा, कचरा संकलनाच्या संदर्भात छोट्या व मोठ्या गाड्या स्लम वस्तीसाठी वाढविणे, मोकळया भूखंडावर कचरा किंवा घाण असल्यास विभागातर्फे कार्यवाही करणे, युपीएचसी व टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्तापणे चालणा–या मनपा दवाखान्याचे कामकाज, आरोग्य विभागाचे औषधी भंडार कामकाज आदी विषयावर चर्चा करण्यात आली. मोकळया भूखंडावर कचरा किंवा घाण असल्यास विभागातर्फे कार्यवाही करणे, युपीएचसी व टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्तापणे चालणा–या मनपा दवाखान्याचे कामकाज, यावेळी आरोग्य समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा यांनी दोन्ही एजन्सीच्या कामाचा झोन निहाय आढावा घेतला. यापूर्वी कनक रिसोर्सेस मॅनेजमेंटतर्फे शहरातील दहाही झोनमध्ये १०७ ठिकाणी कलेक्शन सेंटर तयार करण्यात आले होते. या कलेक्शन सेंटरवर नागरिकांकडून कचरा टाकला जायचा त्यामुळे परिसरात नेहमीच अस्वच्छता राहायची. नवीन एजन्सीतर्फे प्रत्येक झोनमध्ये दोन ठिकाणी कलेक्शन सेंटर तयार करण्यात आले आहेत. जुन्या कलेक्शन सेंटरवर नेहमी स्वच्छता असावी यासाठी त्या ठिकाणी कचरा न टाकण्याचे आवाहन करणारे फलक लावून त्यावर स्वच्छता दुताचे नाव व संपर्क क्रमांक टाकण्यात आले आहे. यानंतरही जर जुन्या कलेक्शन सेंटरवर कचरा आढळल्यास संबंधित एजन्सीवर कारवाई करण्यात येईल, असे सक्त निर्देश त्यांनी दिले. शहरातील रिकाम्या भुखंडांवर कोणतेही बांधकाम होत नसल्याने तिथे अस्वच्छता पसरविली जाते. वारंवार सफाई करूनही तिथे अस्वच्छता होतेच. याबाबत संबंधित भुखंड मालकाला नोटीस बजावून आवश्यक कारवाई करणे, तसेच शहरातील विविध ठिकाणी असलेल्या पडीत शासकीय जमिनीवर काय सुधार योजना राबविण्यात येतील यासंबंधी झोनस्तरावर अहवाल सादर करा असेही निर्देश आरोग्य समिती सभापतींनी दिले.

## दहाही झोनमध्ये सुरू होणार ‘फ्रुट स्टॉल कॅन्टीन’

### महिला व बालकल्याण समिती सभापती संगीता गि–हे यांची घोषणा

महिलांनी उद्योगाची कास धरावी व त्या स्वावलंबी व्हाव्यात यासाठी त्यांना उद्योगाची जोड मिळणे आवश्यक आहे. महिलांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने नागपूर महानगरपालिकेतर्फे प्रत्येक झोन कार्यालय परिसरात लवकरच ‘फ्रुट स्टॉल कॅन्टीन’ सुरू करण्यात येईल, अशी घोषणा महिला व बालकल्याण समिती सभापती संगीता गि–हे यांनी केली.विविध विषयांच्या अनुषंगाने शुक्रवारी (ता.२७) महिला व बालकल्याण समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत समिती सभापती संगीता गि–हे यांच्यासह उपसभापती दिव्या धुरडे, सदस्या मंगला खेकरे, मनिषा अतकरे, नेहा निकोसे, उपायुक्त डॉ.रंजना लाडे, सहायक आरोग्य अधिकारी डॉ.विजय जोशी, सहायक आयुक्त सर्वश्री राजू भिवगडे, गणेश राठोड, हरीश राउत, सहायक आयुक्त स्नेहा करपे, किरण बगडे आदी उपस्थित होते.महिलांच्या उत्थानासाठी मनपाच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ महिलांना मिळावा व त्यातून त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे हा यामागील हेतू आहे. त्यातून प्रत्येक झोनमध्ये ‘फ्रुट स्टॉल कॅन्टीन’ सुरू केले जाणार आहे. महिला बचत गटांना ११ महिन्यांसाठी हे ‘फ्रुट स्टॉल कॅन्टीन’ चालविण्याकरिता देण्यात येणार आहे. यासाठी ईश्वर चिठ्ठीद्वारे महिला बचत गटांची निवड केली जाईल. ११ महिने पूर्ण झाल्यानंतर दुस–या बचत गटांना संधी मिळेल, अशी योजना आहे. यासंदर्भात आवश्यक ती सर्व कार्यवाही झोन सहायक आयुक्तांनी तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश महिला व बालकल्याण समिती सभापती संगीता गि–हे यांनी दिले.

## ‘महिला उद्योजिका मेळावा’ १९ ते २६ जानेवारींदरम्यान

महिलांच्या उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी दरवर्षी मनपाच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे ‘महिला उद्योजिका मेळावा’ आयोजित करण्यात येतो. यावर्षी १९ ते २६ जानेवारी २०२० या कालावधीमध्ये महिला उद्योजिका मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये उद्योग, सामाजिक, शैक्षणिक, कृषी, राजकीय क्षेत्रामध्ये कार्य करणा–या महिलांना आमंत्रित करण्यात येणार आहे. मनपा तसेच शासनातर्फे महिलांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देणारे फलक मेळाव्यात ठिकठिकाणी लावण्यात यावेत. महिला उद्योजिका मेळावा स्थळी अग्निशमन सुविधा, रुग्णवाहिका यासह स्वच्छतेची विशेष काळजी घेण्यात यावी. परिसरात कुठेही सिंगल यूज प्लास्टिकचा वापर होणार नाही, याची विशेष काळजी घेण्यात यावी. यासाठी परिसरात मनपाचे उपद्रव शोध पथक तैनात करण्यात यावेत. मेळाव्यात येणा–या महिलांसाठी आरोग्य तपासणी करण्यात यावी. पिण्याच्या पाण्यासाठी मेळावा स्थळी ‘वाटर एटीएम’ लावण्यात यावेत, असेही निर्देश महिला व बालकल्याण समिती सभापतींनी दिले.यावेळी महिला व बालकल्याण समिती सभापती संगीता गि–हे यांनी विभागातर्फे वितरीत करण्यात आलेल्या शिवणयंत्रांचा आढावा घेतला. विभागातर्फे २०१८–१९ या वर्षात ११० तर २०१९–२० या वर्षामध्ये १३० शिवणयंत्र वितरीत करण्यात आले आहेत. शिवणयंत्रांचा अधिकाधिक महिलांना लाभ घेता यावा यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सदस्यांकडे प्रत्येकी पाच शिवणयंत्र देण्यात यावे. यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश महिला व बालकल्याण समिती सभापतींनी दिले.